# महाराष्ट्र विधानपरिषद
# दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## मंगळवार, दिनांक २२ मार्च, २०२२
## (सकाळी १०.०० ते ११.४५ वाजेपर्यंत)

**(मंगळवार, दिनांक १५ मार्च, २०२२, बुधवार, दिनांक १६ मार्च, २०२२ व सोमवार, दिनांक २१ मार्च, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) — (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर) —**

**सर्वश्री शशिकांत शिंदे,** दिवाकर रावते, डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री विक्रम काळे, रविंद्र फाटक, अमरनाथ राजूरकर, सतीश चव्हाण, नरेंद्र दराडे, डॉ.वजाहत मिर्झा, सर्वश्री विप्लव बाजोरिया, मोहनराव कदम, अनिकेत तटकरे, विलास पोतनीस, राजेश राठोड, अमोल मिटकरी, डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री अभिजित वंजारी, संजय दौंड, अंबादास दानवे, जयंत आसगावकर, दुष्यंत चतुर्वेदी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुनिल शिंदे, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"राज्यातील अस्तित्वात असलेल्या व दुरवस्था झालेल्या ग्रामीण रस्त्यांची दर्जोन्नती करणे यासाठी मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-१ च्या धर्तीवर राज्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-२ या योजनेची टप्प्याटप्प्यात अंमलबजावणी करण्यात आली असणे, प्रथम टप्प्यात रस्ते दर्जोन्नतीसाठी १० हजार किलोमीटर लांबीवर काम करण्यात येणार असून त्यापैकी सन २०२१-२२ या वर्षात ३ हजार किलोमीटर लांबीवर काम करण्यात आले. या प्रकल्पाची एकूण किंमत ७ हजार ५०० कोटी रुपये असणे, सन २०२२-२३ मध्ये ३ हजार कोटी इतक्या निधीची आवश्यकता असून रस्त्याच्या कामात निधी कमी पडल्यास नाबार्ड बँक आशियाई विकास बँक वा तत्सम संस्थेकडून कर्जरुपी निधी उपलब्ध करुन घेण्याचा निर्णय सुध्दा शासनाने घेतलेला असणे, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-१ मध्ये बऱ्याच त्रुटी आहेत. त्या दूर करण्याची आवश्यकता आहे. पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत एकूण ६ हजार ५५० किलोमीटर रस्त्याचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्यात आला असून पहिल्या टप्प्यात २९२५ किलोमीटर बांधकामाला मान्यता प्राप्त झाली असून २०१७७ कोटी रुपये खर्च होणार असणे, ग्रामीण भागातील कोरोनामुक्तीच्या कामाला प्रोत्साहन मिळावे यासाठी राज्यातील प्रत्येक महसूली विभागात पहिल्या ३ ग्रामपंचायतींना अनुक्रमे ५० लाख, २५ लाख व १५ लाख रुपयांचे बक्षीस देण्याचा शासनाने चांगला निर्णय घेतलेला असणे,

अप्रकाशित प्रत

राज्यात ५ लाख ४२ हजार ९४४ महिला स्वयंसहाय्यता गट कार्यरत असून ५५ लाख ३५ हजार ४३२ कुटूंबांचा त्यात समावेश करण्यात आला असून ११ हजार १४० कोटी रुपयांचे कर्जवाटप करण्यात आलेले असणे, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेअंतर्गत १० हजार २३१ गटांना २६ कोटी रुपये बीजभांडवल वाटप करण्यात आलेले असणे, ग्रामीण भागातील घरकूलांच्या निर्मितीला गती देण्यासाठी ग्रामीण महाआवास अभियानाचा शासनाने प्रारंभ केला असून आतापर्यंत ४ लाख २५ हजार घरकुले पुर्ण करण्यात येणे, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेतून ५,३९,५२,२६८ इतके मनुष्यबळ निर्मिती करण्यात आली. स्वच्छ भारत मिशनमधून ८ लाख ७८ हजार ७११ शौचालये बांधण्यात आली. प्रधानमंत्री उज्वला योजनेतून ५ लाख ७५ हजार १८३ महिलांना गॅस जोडणी करण्यात आलेली असणे, सौभाग्य योजनेतून ५ लाख ७८ हजार १५१ विद्युत जोडण्या देण्यात आलेल्या असणे, अनुसूचित जमातींचे बनावट जात वैधता प्रमाणपत्रे सादर करुन इतर जातीच्या उमेदवारांनी शासकीय नोकरी मिळविली असणे, ज्यांनी अशी बनावट जातप्रमाणपत्रे दिली आहेत त्यांच्यावर कार्यवाही करणे आवश्यक असणे, आदिवासी शालेय विद्यार्थीनींना शालेय भत्ता गेल्या २० वर्षापासून प्रत्येक दिवशी १ रुपया देण्यात येतो यात वाढ करुन आदिवासी विद्यार्थीनीना कमीतकमी १० रुपये शालेय भत्ता देण्यात यावा. मानव विकास निर्देशांकास उंची देण्यासाठी राज्य शासनाने आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ राज्यात सुरु करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतलेला असणे, ऑलिम्पिकसाठी राज्यातील निवड झालेल्या १० खेळाडूंना प्रशिक्षण व सरावासाठी रु. ५ कोटी इतकी आर्थिक सहाय्य करणारे देशातील महाराष्ट्र एकमेव राज्य असून नवीन व्यायाम शाळेच्या बांधकामाची मर्यादा ७ लक्ष रुपयावरुन १२ लक्ष इतकी करण्याची आवश्यकता, नवीन व्यायाम शाळांच्या साहित्य खरेदीसाठी जास्त निधीची तरतूद करण्यात यावी. डीपीसी योजनेअंतर्गत क्रिडांगण विकास योजनेला व्यापक स्वरुप देऊन तरतूद ७ लक्ष रुपयावरुन १० लक्ष करण्यात यावे त्यात रनिंग ट्रॅक, जॉगिंग ट्रॅक विकसित करावे जेणे करुन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना पोलीस भरती व इतर मैदानी खेळासाठी चालना मिळेल, विदेशी गायींच्या जातीपैकी सर्वात जास्त दूध देणारी गाय होलस्टीन फ्रिजीयन ( एका वेतात सरासरी ९ ते १२ हजार लिटर) ही आहे. तसेच भारतीय जातीपैकी सर्वात जास्त दुध देणारी गाय साहीवाल (एका वेतात सरासरी ४ ते ६ हजार लिटर) ही आहे. महाराष्ट्र राज्यातील जातीपैकी सर्वात जास्त दुध देणारी गाय देवणी (एका वेतात १ ते दीड हजार लिटर) ही आहे. होलस्टीन फ्रिजियन गाय सध्या पुणे येथील भाग्यलक्ष्मी फार्म, येथे असून भारतीय वातावरणात ही गाय एका वेतात ११,५०० लिटर दूध देत आहे. होलस्टीन फ्रिजियन गाय राज्यात आणण्यासाठी शेतकऱ्यांना अनुदान देण्याची

गरज, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी. "

## (दुपारी १२-०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे —**

**(क)** मंगळवार, दिनांक १५ मार्च, २०२२ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील राखून ठेवण्यात आलेला **श्री.प्रविण दरेकर व इतर वि.प.स.** यांचा "**मुस्लिम समाजाला शैक्षणिक व नोकरीमध्ये आरक्षण देण्याबाबत**" या विषयावरील **तारांकित प्रश्न क्रमांक १२७१५**

**(ख)** मंगळवार, दिनांक १५ मार्च, २०२२ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील राखून ठेवण्यात आलेला **श्री.सतिश चव्हाण व इतर वि.प.स.** यांचा "**राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन थकबाकी देण्याबाबत**" या विषयावरील **तारांकित प्रश्न क्रमांक ११८०६**

**(ग) तारांकित प्रश्न.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

**कामगार मंत्री :**

**(क)** "मुंबई लोखंड व पोलाद कामगार मंडळ यांचे सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे पन्नासावा व एकावन्नावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "सातारा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचे सन २०११-२०१२, सन २०१२-२०१३ व सन २०१३-२०१४ या वर्षांचे अनुक्रमे एकवीसावा, बावीसावा व तेवीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** "दि रेल्वे गुडस् क्लिअरिंग ॲण्ड फॉरवर्डिंग एस्टॅब्लिशमेंटस् लेबर बोर्ड, मुंबई यांचे सन २०१६-२०१७, सन २०१७-२०१८, सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचे अनुक्रमे चाळीसावा, एकेचाळीसावा,

असुधारित प्रत

बेचाळीसावा व त्रेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** "कापड बाजार आणि दुकाने मंडळ यांचे सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचे अनुक्रमे अठ्ठेचाळीसावा व एकोणपन्नासावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ङ)** "औरंगाबाद माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचे सन २०१६-२०१७, सन २०१७-२०१८, सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचे अनुक्रमे पंचवीसावा, सव्वीसावा, सत्तावीसावा व अठ्ठावीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(च)** "बीड जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा तेवीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(छ)** "धुळे - नंदुरबार जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचे सन २००९-२०१०, सन २०१०-२०११, सन २०११-२०१२, सन २०१२-२०१३, सन २०१३-२०१४, सन २०१४-२०१५, सन २०१५-२०१६ व सन २०१६-२०१७ या वर्षांचे अनुक्रमे एकवीसावा, बावीसावा, तेवीसावा, चोवीसावा, पंचवीसावा, सव्वीसावा, सत्तावीसावा व अठ्ठावीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ज)** "अमरावती जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचे सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे अठ्ठावीसावा व एकोणतीसावा वार्षिक अहवाल"

असुधारित प्रत

सभागृहासमोर ठेवतील.

**(झ)** "कापूस बाजार कामगार मंडळ, (बृहन्मुंबई, ठाणे व रायगड जिल्ह्यांकरीता) यांचे सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे अठ्ठेचाळीसावा व एकोणपन्नासावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ञ)** "धातू (लोखंड व पोलाद वगळून) आणि कागद बाजार व दुकाने माथाडी कामगार मंडळ यांचे सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे सत्तेचाळीसावा व अठ्ठेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ट)** "मुंबई भाजीपाला बाजार असंरक्षित कामगार मंडळ यांचे सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचे अनुक्रमे चौतीसावा व पस्तीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ठ)** "नांदेड माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचे सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचे अनुक्रमे सत्तावीसावा व अठ्ठावीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ड)** "कोल्हापूर जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचे सन २०१७-२०१८, सन २०१८-२०१९, सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ढ)** "नाशिक माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा चौतीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ण)** "रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ यांचे

असुधारित प्रत

सन २०१८-२०१९, सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे तेरावा, चौदावा व पंधरावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(त)** "क्लिअरिंग आणि फॉरवर्डींग असंरक्षित गोदी कामगार मंडळ यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा एकोणतीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(थ)** "अकोला-वाशिम-बुलडाणा जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा तीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(द)** "माल वाहतूक कामगार मंडळ यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा एकोणपन्नासावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ध)** "चंद्रपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांचा सन २०१५-२०१६, सन २०१६-२०१७, सन २०१७-२०१८, सन २०१८-२०१९, सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचा अनुक्रमे पहिला, दुसरा, तिसरा, चौथा, पाचवा व सहावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(न)** "अहमदनगर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(प)** "सांगली जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा

असुधारित प्रत

वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(फ)** "सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा चाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ब)** "नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा पंधरावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(भ)** "धुळे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ (अंतर्गत जळगाव, धुळे व नंदूरबार जिल्हे) यांचे सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचा वैधानिक लेखापरिक्षण व कामकाज अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(म)** "कोल्हापूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांचे सन २०१८-२०१९, सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने –**

(१) **ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक १५** वर **वित्त मंत्री** निवेदन करतील:-

"वस्तु व सेवाकर विभागात वर्षानुवर्षे कंत्राटी तत्वावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना माहे मार्च, २०१९ मध्ये सेवेतून काढून टाकल्यामुळे ते बेरोजगार होणे, या कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्याबाबत."

(२) **सर्वश्री नागोराव गाणार,** प्रविण दरेकर, ॲड. निरंजन डावखरे, श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, **वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक १४** वर **शालेय शिक्षण मंत्री** निवेदन करतील:-

असुधारित प्रत

"१०० टक्के अनुदानित शाळांमधील १३५८ विशेष शिक्षकांची सामान्य शाळेतील रिक्त पदांवर समायोजित करण्याच्या नियुक्तीमध्ये झालेल्या गैरव्यवहाराची उच्चस्तरीय चौकशी करण्याबाबत."

(३) **सर्वश्री प्रविण दरेकर,** प्रसाद लाड, विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ. परिणय फुके, सर्वश्री सुरेश धस, सदाशिव खोत, विनायक मेटे, गोपिचंद पडळकर, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री निलय नाईक, प्रविण दटके, नागोराव गाणार, चंदूभाई पटेल, **वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक १२** वर **गृहनिर्माण मंत्री** निवेदन करतील:-

"मुंबईतील वरळी, नायगाव व ना.म.जोशी मार्ग येथील बी.डी.डी.चाळींचा पुनर्विकास प्रकल्पात अखिल बी.डी.डी.चाळी महासंघाचे पदाधिकारी यांनी केलेल्या फसवणुकीची चौकशी करुन बी.डी.डी. चाळीतील रहिवाशांना न्याय मिळवून देण्याच्या मागणीबाबत."

(४) **सर्वश्री चंदूभाई पटेल,** प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री. सुरेश धस, **वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक १३** वर **नगरविकास मंत्री** निवेदन करतील:-

"भुसावळ नगरपरिषदेमध्ये रस्ते विकासाची कामे, अतिक्रमण निष्कासित करणे अशा अनेक कामांमध्ये होत असलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत."

(५) **श्री.चंद्रशेखर बावनकुळे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक १६** वर **नगरविकास मंत्री** निवेदन करतील:-

"नगरपरिषद कळमेश्वर- ब्राम्हणी (जि.नागपूर) अंतर्गत झालेल्या सिटी सर्वेकरीता निविदा काढून खाजगी संस्थाकडून सिटी सर्वेचे काम करून घेतलेले असणे, या संस्थाकडून झालेले काम चुकीचे असून सदर सर्वेक्षण रद्द करून पुनःसर्वेक्षण करणेबाबत."

**चार : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

(१) **डॉ.प्रज्ञा सातव, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **गृह मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यात अनेक ठिकाणी जुगार व मटका मोठ्या प्रमाणात अवैधरीत्या सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०२२ रोजी व त्या सुमारास उघडकीस येणे, या अवैध धंद्यांमुळे अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाल्याचे आढळून येणे, या मटका व जुगारामुळे कित्येक लोक देशोधडीला लागल्याचे आढळून येणे, या अवैधपणे सुरु असलेल्या जुगार व मटका धंद्यांबाबत ग्रामस्थांद्वारे वारंवार संबंधित पोलिस स्टेशनला तक्रार करण्यात येणे, यासंदर्भात पोलिसांनी घातलेल्या छाप्यात तब्बल ३४

जुगाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात येणे, मात्र काही दिवसांनी हे गुन्हेगार बाहेर आल्यावर पुन्हा अवैध मटका व जुगार पूर्वीप्रमाणेच सुरू असल्याचे आढळून येणे, त्यामुळे ग्रामस्थांमध्ये निर्माण झालेले चिंतेचे व भीतीचे वातावरण, सध्या हिंगोली जिल्ह्यातील सुरू असलेले मटका जुगार हे अवैध धंदे कायमस्वरुपी बंद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **श्री.संजय दौंड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मौजे अंबाजोगाई, जि.बीड येथील इनाम जमीन स.नं.१८४ क्षेत्र ५ हेक्टर ०४ आर च्या महसूली अभिलेखानुसार मालकी रकान्यात श्री योगेश्वरी देवस्थान अंबाजोगाई असे नमूद असून पदसिध्द अध्यक्ष तहसिलदार अंबाजोगाई असणे, सदर प्रकरणी अर्जदार यांनी उपजिल्हाधिकारी (सामान्य) भुसुधार बीड यांचेकडे गैर अधिकाराने व गैरहेतुने सदर मिळकतीसाठी हक्क मिळणेकरिता अर्ज सादर करणे, सदर प्रकरणी हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदाने कायदा १९५४ च्या तरतुदी लागू होत नसणे, तसेच या प्रकरणात अतियात चौकशी कायदा, १९५२ व इतर अनुषंगिक कायद्यातील तरतुदींचा अंतर्भाव होत असतानाही त्याकडे जाणीवपूर्वक व हेतुपुरस्सर डोळेझाक करण्यात येणे, सदर प्रकरणी श्री योगेश्वरी देवस्थान अंबाजोगाई यांची मालकी रकान्यात नोंद असतानाही तसेच तहसिलदार अंबाजोगाई हे पदसिध्द अध्यक्ष असतानाही त्यांना जाणीवपूर्वक प्रतिवादी न करण्यात येणे, याप्रकरणी सर्व संबंधितांची बाजू ऐकून न घेता संगनमताने अर्जदार व उपजिल्हाधिकारी (सामान्य) भुसुधार बीड यांनी अर्जदारांचा मालकी हक्क मान्य करणे, त्यामुळे सदर देवस्थान, स्थानिक जनता व भाविक यांच्यामध्ये शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष व त्यामुळे शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **श्री.विलास पोतनीस, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई उपनगरातील सर्वच गृहनिर्माण संस्था व भूखंडधारकांना लाखो रुपयांचा अकृषिक कर भरण्याच्या नोटिसा जारी करण्यात आल्या असणे, दिनांक ३१ मार्च, २०२२ पर्यंत हा कर न भरल्यास रहिवाश्यांना भरमसाठ दंड व प्रसंगी गृहनिर्माण संस्थांचे खाते जप्त करण्याच्या देण्यात आलेल्या धमक्या, सन २००६ मध्ये या कराच्या दरात बदल करून रेडीरेकनरनुसार कर आकारणी सुरू झालेली असणे, तद्नंतर त्यास स्थगिती देण्यात आलेली असून सदरहू स्थगिती गतवर्षी उठविण्यात आली असणे, त्यानंतर या नोटिसा पाठविण्यास सुरुवात झालेली असणे, शहर आणि गावठाण परिसर तसेच ज्या

भूखंडांना अकृषिक करातून वगळण्यात आले अशांना हा कर लागू नसणे, मात्र उपनगरातच हा कर लागू ठेवणे अन्यायकारक असणे, कर आकारणीबाबतची स्थगिती उठविल्यानंतर मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयाने म्हाडाच्या मुंबई मंडळाला १८२ कोटी रुपये थकीत अकृषिक सारा भरण्यासंदर्भात नोटीस पाठविली असणे, सदरहू नोटीसीच्या अनुषंगाने मुंबई मंडळाने उपनगरातील सहकारी गृहनिर्माण संस्थांना थकीत अकृषिक कर व्याजासह भरण्यासाठी नोटीसा पाठविल्या असणे, तर तहसीलदार यांनी भूखंडधारकांना नोटीसा बजावल्या असणे, त्यामुळे मुंबई उपनगरीय जनतेत पसरलेली कमालीची नाराजी, सद्य:स्थिती शासन स्तरावरील गतकाळातील धरसोड लक्षात घेता महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या तरतुदींचा शासनाने आढावा घेवून अकृषिक कर रद्द करून अथवा या करात सवलत देण्याबाबत तातडीने निर्णय घेऊन शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री रमेशदादा पाटील,** प्रविण दरेकर, विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **नगरविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई शहरात पाचशे चौरस फुटांच्या घरांना मालमत्ता कर माफीचा निर्णय नवीन वर्षाच्या सुरुवातीला माननीय मुख्यमंत्री महोदय यांनी जाहीर करणे, मात्र या निर्णयाचा कुठलाही फायदा मुंबई शहर व उपनगरातील कोळीवाडे गावठाण आणि आदिवासी पाड्यांना होणार नसून या ठिकाणी असणाऱ्या पाचशे चौरस फूटांहून अधिक जागा असलेल्या घरांना कर भरावाच लागणार असल्याने अशा घरमालकांना करातून सूट देण्याचा अधिकार मुंबई महापालिकेच्या अधिनियमात नसल्यामुळे या निर्णयाचा भूमिपुत्रांना कुठलाही लाभ होणार नसणे, मुंबईसह पश्चिम व पूर्व उपनगरात ४२ कोळीवाडे १८९ गावठाण आणि २२२ आदिवासी पाडे असून पिढ्यान पिढ्या मुंबईत वास्तव्यास असून त्यांची घरे पाचशे चौरस फुटांहून अधिक असल्याने या घरांना मालमत्ता कर माफ करण्यासाठी शासनस्तरावर धोरणात्मक निर्णय होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **सर्वश्री प्रविण दरेकर,** विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, सर्वश्री सुरेश धस, सदाशिव खोत, प्रसाद लाड, गोपिचंद पडळकर, विनायकराव मेटे, डॉ.रणजित पाटील, सर्वश्री निलय नाईक, प्रवीण दटके, रमेशदादा पाटील, चंदूभाई पटेल, नागोराव गाणार, ॲड.निरंजन डावखरे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **नगरविकास मंत्र्यांचे** लक्ष

अप्रकाशित प्रत

वेधतील :-

"संपूर्ण राज्यासाठी विकास हस्तांतरण हक्क (टीडीआर) संदर्भात नवीन नियमावली दिनांक २९ जानेवारी, २०१६ रोजी लागू करण्यात आलेली असणे, त्यानुसार, पुणे शहरातील टीडीआर झोन रद्द होऊन, शासकीय जमीन दरानुसार (रेडी रेकनर रेट) टीडीआर अदा करण्यात येणे, सदर नियमावलीनुसार, दिनांक २९ जानेवारी, २०१६ पूर्वी टीडीआर झोननुसार अदा केलेल्या, परंतु दिनांक २९ जानेवारी, २०१६ रोजी शिल्लक असलेल्या डीआरसी सदर तारखेपासून एक वर्षात म्हणजेच दिनांक २८ जानेवारी, २०१७ पर्यंत टीडीआर झोननुसार वापरता येतील असे नमूद असूनही त्यात काही अडचणी उद्‌भवल्यामुळे पुणे मनपाने वेळोवेळी नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासनाचे मार्गदर्शन प्राप्त करुन घेणे, त्यानुसार अंतिमत: नगर विकास विभागाने दिनांक ६ ऑगस्ट २०२१ रोजी मा.आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांना पत्र पाठवून संपूर्ण प्रक्रिया सुस्पष्ट करणे, तरीही आजतागायत, पुणे महानगरपालिकेने सदर मार्गदर्शनानुसार संदर्भीय डीआरसीबाबत प्रत्यक्ष अंमलबजावणी केलेली नसणे, यामुळे अशा अनेक डीआरसी सध्या अडकून पडल्या असून, सदर डीआरसी धारकांचे मोठे आर्थिक नुकसान होत असणे, परिणामी डिआरसी धारकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(६) **श्री.शशिकांत शिंदे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत सन २००८ मध्ये सातारा जिल्हयातील जावळी तालुक्यात करंजे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्यात येणे, सदर प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेअंतर्गत मौ.करंजेसह मामुर्डी, चोरांबे, गवडी, आंबेघर आदी गावांसह २१ गावांचा समावेश असणे, त्यानुसार या गावांना पाणीपुरवठा मागणीनुसार टंचाई कालावधीत पाणीपुरवठा करण्यात येणे, तथापि सन २०१४ पासून सदर योजनेच्या विद्युत देयकांची थकबाकी राहिल्यामुळे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने वीजपुरवठा खंडीत करणे व तेव्हापासून सदर पाणीपुरवठा योजना बंद स्थितीत असणे, सदर पाणीपुरवठा योजनेचा देखभाल दुरुस्ती खर्च व पाणीपट्टी खर्च परवडत नसल्याने सदर गावे मागील १० वर्षापासून प्रादेशिक योजनेतून पाणी घेत नसणे, सन २०११-२०१३ पर्यंत गावांमध्ये स्वतंत्र योजना राबविण्यात येऊन सद्य:स्थितीत त्या दोन गावांना स्वतंत्र पाणीपुरवठा योजनेतून पाणीपुरवठा होत असणे, मामुर्डी, गवडी, सावली, जवळवाडी व चोरांबे या गावांना मजिप्रामार्फत जलजीवन मिशनअंतर्गत कोणतेही काम

प्रस्तावित नसल्यामुळे जिल्हा परिषदेमार्फत त्याप्रकरणी कार्यवाही व्हावी असे कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, सातारा यांचेकडून त्याचे दिनांक २५ जानेवारी, २०२२ रोजीच्या पत्रान्वये मा.मुख्य अभियंता, मजिप्रा प्रादेशिक विभाग, पुणे यांना कळविण्यात आलेले असणे, त्यामुळे जलजीवन मिशन रेट्राफिटिंग मार्गदर्शक तत्वानुसार, ज्या योजनेचे रेट्रोफिटिंग करुन ५५ लिटर दरडोईप्रमाणे पाणीपुरवठा करता येईल अशा सर्व योजनांचे रेट्रोफिटिंग घेता येईल त्यानुसार सावली, मामुर्डी, जवळवाडी, चोरांबे या गावांच्या स्वतंत्र योजनांचे रेट्रोफिटिंगचे प्रस्ताव तयार करण्यात येणे, त्यानुसार सदर प्रकरणी कार्यवाही करण्याची आवश्यकता त्याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**पाच : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास).**

## - मध्यंतर -

**सहा : म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**

**(मंगळवार, दिनांक १५ मार्च, २०२२ व सोमवार, दिनांक २१ मार्च, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा)** —[**अनुक्रमांक** (१)] —

(१) **सर्वश्री जयंत पाटील,** कपिल पाटील, विक्रम काळे, बाळाराम पाटील,
**वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**

"रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना उद्‌ध्वस्त करु पाहणाऱ्या नव्याने येऊ घातलेल्या सिडकोच्या नैना प्रकल्पाला शेतकऱ्यांचा विरोध असून नैना कडून गेली आठ वर्षे शेतकऱ्यांवर होत असलेल्या अन्यायामुळे नैना प्रकल्प रद्द करण्याची मागणी होत असणे. नैना प्रकल्पाचे संकट शेतकऱ्यांसाठी कोरोनापेक्षाही भयंकर आहे, त्यामुळे एकवेळ कोरोना होऊन मरण्यापेक्षा नैना प्रकल्पाच्या विरोधात लढून मेलो तरी बेहत्तर असा आक्रमक पवित्रा शेतकऱ्यांनी घेतला असणे. जानेवारी २०१३ पासून नैना प्रकल्प आला पण आज पर्यंत येथे असलेले शेतकरी भुधारक ग्रामस्थ यांचे राहणीमान उंचावण्यासाठी मूलभूत, भौतिक सुविधा दिलेल्या नसणे, शेतकऱ्यांना, भूधारकांना विकासकांना ४० टक्के तुकडा आणि सिडकोला ६० टक्के हिस्सा, या प्रकल्पामध्ये शेतकरी आणि विकासक जे बाधित होतील त्यांना मिळणाऱ्या अंतिम ४० टक्के भूखंडावर प्रत्येक गुंठ्यावर प्रचंड रक्कम आकारली जाणे, नैना प्रकल्प जुने मुंबई पुणे महामार्ग यांच्या पूर्व भागात असणाऱ्या ग्रामस्थांविरुध्द एक षडयंत्र असणे, तसेच नैना प्रकल्पामध्ये बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांना शेतकरी असल्याचा दाखला सुध्दा मिळत

अप्रमाणित प्रत

नसणे, आपलं गाव सोडून किंवा नैना क्षेत्र सोडून या शेतकऱ्यांच्या कुठे जागा नसून, त्यामुळे त्यांची शेती गेल्यानंतर त्यांना अंतिम भूखंड मिळाल्यानंतर शेतकरी असल्याचा दाखला राहात नसून, त्यांना शेतकरी असल्याचा दाखला देण्याचे सिडकोने नाकारले असणे नैना प्रकल्पासाठी ग्रामपंचायतीच्या मालकीच्या शेकडो एकर जमिनी, गाव गवणी, तलाव, रस्ते व गुरचरण इत्यादी सिडकोच्या घशात घालण्याचा डाव असल्यामुळे नैना प्रकल्प रद्द करण्यात यावा. सबब शेतकऱ्यांमध्ये व प्रकल्पग्रस्तामध्ये चिंतेचे वातावरण पसरल्याने शासनाकडून करण्यात येत असलेली कार्यवाही व उपाययोजना."

(२) **सर्वश्री विक्रम काळे,** सतिश चव्हाण, सुधीर तांबे **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"राज्यात कोरोना महामारीमुळे शिक्षण क्षेत्राचे अतोनात नुकसान होणे, विदयार्थ्यांचे भवितव्य अडचणीत येणे, यामुळे ऑनलाईन शिक्षणाचे महत्व अधोरेखीत होणे, त्यामुळे प्रत्येक शाळेत संगणक ज्ञान असलेल्या शिक्षकाची गरज निर्माण होणे, कला, क्रिडा व ग्रंथपाल यांची शाळेमध्ये असण्याची नितांत आवश्यकता, शिक्षक-शिक्षकेत्तर यांची हजारोंच्या संख्येने रिक्त पदे असणे, शिक्षक होण्यासाठी अनिवार्य असलेल्या टीईटी परिक्षेत झालेला मोठा आर्थिक घोटाळा, परिक्षेच्या एकूणच कार्यशैलीवर निर्माण झालेले प्रश्न चिन्ह, यामुळे नवशिक्षकांचे टांगणीला लागलेले भवितव्य, टीईटी व टॅट परिक्षा उत्तीर्ण होऊनही शिक्षक भरतीच्या पवित्र पोर्टलमध्ये असलेल्या त्रुटी व त्यामुळे भरतीस होणारा विलंब म्हणून पवित्र पोर्टल रद्द करण्याची होत असलेली मागणी, सन २००८ नंतर १०० टक्के अनुदानावर आलेल्या शाळांना वेतनेतर अनुदान न मिळणे, शाळांना विज देयके व मनपा कर व्यापारी दराने लावणे, मराठी व उर्दू माध्यमिक शाळांना एवढ्या मोठ्या रक्कमेची देयके भरण्यासाठी कोणताही आर्थिक स्त्रोत नसणे, त्यामुळे मराठी व उर्दू माध्यमाच्या शाळा अडचणीत येणे, जन्मदर व कुटुंब नियोजन यामुळे घटणारी बालकांची संख्या विचारात घेणे, इंग्रजी शाळांची वाढती संख्या परिणामी मराठी शाळा पटसंख्ये अभावी बंद पडण्याची निर्माण झालेली भिती, सर्वसामान्यांच्या लेकरांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी प्रत्येक तालुक्यात एक निवासी सेमी इंग्लिश शाळा निर्माण करण्याची गरज, एकाच गावात समान इयत्तेच्या जिल्हा परिषद व खाजगी संस्थेच्या शाळांची वाढलेली संख्या, परिणामी मोठया संख्येने शिक्षक अतिरिक्त होण्याची भिती, संच मान्यतेच्या निकषात सुधारणा करणे, टप्पा अनुदान शाळांना प्रचलित धोरणानुसार अनुदान देण्याची गरज, अघोषित व त्रुटी पूर्तता शाळांना अनुदान देण्याची गरज, दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वीच्या व नंतरच्या शिक्षक कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याची गरज, सर्व अनुदानित व अंशत: अनुदानित शिक्षक कर्मचाऱ्यांना

कॅशलेस वैद्यकीय सुविधा लागू करण्याची गरज, जिल्हा परिषद माध्यमिक शाळेतील वर्ग-२ ची रद्द केलेली मुख्याध्यापकांची पदे पुन्हा कायम ठेवणेबाबत होत असलेली मागणी मुख्याध्यापक, पदवीधर शिक्षक, विस्तार अधिकारी यांची व जिप शिक्षकांमधून गट शिक्षणाधिकारी व उप शिक्षणाधिकारी यांची वेळोवेळी रखडलेली पदोन्नती, नेट/सेट, पीएचडी अशी उच्च पदवीधारण करणाऱ्या शिक्षकांना उच्च पदस्थापना मिळण्याची आवश्यकता व प्रोत्साहनपर ज्यादा वेतनवाढ देण्याची गरज, शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी नॅकच्या धर्तीवर सॅकची निर्मिती करुन शाळांना प्रोत्साहनपर विशेष अनुदान देण्याची गरज, जिल्हानिहाय वाढलेली शाळांची संख्या लक्षात घेऊन शिक्षण विभागातील रिक्त पदे भरणे तसेच नव्याने पद निर्माण करण्याची गरज, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

सात : (क) **सर्वश्री दिवाकर रावते,** डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री शशिकांत शिंदे, विलास पोतनीस, अमरनाथ राजूरकर, विक्रम काळे, डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री मोहनराव कदम, सतीश चव्हाण, सुनिल शिंदे, डॉ.वजाहत मिर्झा, सर्वश्री अनिकेत तटकरे, रविंद्र फाटक, राजेश राठोड, अमोल मिटकरी, नरेंद्र दराडे, अभिजित वंजारी, संजय दौंड, विप्लव बाजोरिया, जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री अंबादास दानवे, दुष्यंत चतुर्वेदी, किशोर दराडे, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव –**

"मुंबईतील बऱ्याच इमारती ५० वर्षापेक्षा जास्त जुन्या झाल्यामुळे सदर इमारतींचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता, मुंबईतील हवाईमार्गात (फनेल झोन) येणाऱ्या विमानतळाच्या परिसरातील इमारतींना उंचीची मर्यादा असणे, त्यामुळे या इमारतींचा विकास व पुनर्विकास आर्थिकदृष्ट्या अव्यवहार्य असणे, मुंबई महापालिकेने सदर इमारतींचा नमूना गणनेच्या आधारे पुनर्विकास करण्यासाठी नगरविकास विभागाने योग्य निर्णय घेण्याची आवश्यकता, मुंबई महानगरपालिका हद्दीत भोगवटा प्रमाणपत्र नसलेल्या व वर्षानुवर्षे प्रतिक्षेत असलेल्या इमारतींचा भोगवटा प्रमाणपत्रांबाबत "क्षमापित" निर्णय घेणे व मध्यम वर्गीय नागरीकांना दिलासा देणे, राज्यातील शहरांमधील एसआरए सक्षम प्राधिकाऱ्याने झोपडीधारकांची पात्रता ९० दिवसात प्रक्रिया पूर्ण करण्याची आवश्यकता, मुंबई उपनगर, ठाणे व पुणे जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिक तसेच सहकारी गृहनिर्माण संस्था अन्य वेगवेगळ्या संस्थांना सन १९९६ पासून २०२१ पर्यंत २५ वर्षाचा कालावधीच्या एकत्रित अकृषिक आकारणीच्या नोटीसा देण्यात येणे, सदर नोटीसांमधील अकृषिक आकारणीचे प्रमाणदर अवाजवी असणे, सदर रक्कम भरण्यासाठी देण्यात आलेला अल्प कालावधी, सदर रक्कम न भरल्यास संबंधितांची बँक

अप्रकाशित प्रत

खाती/कार्यालये सील करणे, कोविड-१९ जागतिक महामारीच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य नागरीक/ व्यावसायिक अडचणीच्या काळात जात असतांना शासनाकडून या अकृषिक आकारणीमध्ये मदतीची अपेक्षा, पी.एम.जी.पी. प्रकल्पांतर्गत शासनाच्या, खाजगी जमिनीवरील व म्हाडाच्या ५६ वसाहतीमधील सोसायट्यांना लावण्यात आलेला व्याजासहीत एन.ए.टॅक्स रद्द करण्याबाबत निर्णय घेण्याची आवश्यकता, म्हाडाच्या थकीत सेवा शुल्काबाबत उपाययोजना जाहीर करणे, तालुका तेथे म्हाडा प्रकल्पाची आवश्यकता, पुणे येथील जुन्या व जीर्ण झालेल्या म्हाडा इमारतींच्या पुनर्विकासाची आवश्यकता, राज्यभरातील जमिनीवरील म्हाडाचे असलेले आरक्षण व त्या जमिनींचा विकास व पुनर्विकास, म्हाडामार्फत नोकरदार महिलांसाठी वसतीगृह व मुलां-मुलींकरीता वसतीगृह बांधण्याबाबत कार्यवाही, पश्चिम उपनगरात आरक्षित भूखंडावर म्हाडामार्फत मोठ्या रुग्णालयांची उभारणी, मुंबईतील वांद्रे (पश्चिम) येथे म्हाडाच्या जागेवर पशुवैद्यकीय दवाखान्यांची उभारणी, शासकीय जमिनींवर असलेल्या गृहनिर्माण सोसायट्यांच्या इमारतींचा पुनर्विकास म्हाडामार्फत करण्याचा पर्याय उपलब्ध करण्याबाबत, प्रलंबित असलेल्या झोपडपट्ट्यांचा विकास करण्यासाठी ॲमनेस्टी स्किम त्वरीत अंमलात आणण्याची आवश्यकता, केंद्र शासनाच्या जागेवर असलेला झोपडपट्ट्यांचा प्रलंबित पुनर्विकास, एसआरए योजना संपूर्ण महाराष्ट्राला लागू करणे, धारावी झोपडपट्टी व बीडीडी चाळींचा पुनर्विकास करणे, याबाबत करावयाची निर्णयात्मक कार्यवाही विचारात घेण्यात यावी."

(ख) **सर्वश्री प्रविण दरेकर,** विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे, सुरेश धस, सदाशिव खोत, गोपिचंद पडळकर, विनायक मेटे, डॉ.रणजित पाटील सर्वश्री प्रविण पोटे पाटील, महादेव जानकर, रणजितसिंह मोहिते-पाटील, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री निलय नाईक, चंदुभाई पटेल, प्रविण दटके, रमेशदादा पाटील, नागोराव गाणार, राजहंस सिंह, रामदास आंबटकर, रमेश कराड, अमरीशभाई पटेल, रामराव पाटील, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"राज्याच्या विकासात निर्माण झालेला प्रादेशिक असमतोल, विदर्भ, मराठवाडा, कोकणात व खानदेशासाठी स्वतंत्र उद्योग धोरण जाहीर करण्यात येईल, अशी निवडणूकपूर्व घोषणा करुनही उद्योग उभारण्यात सरकारला आलेले अपयश, नागपूर कराराचे पालन करण्याबाबत शासनाने दाखविलेली उदासिनता, मागील सरकारने सुरु केलेल्या मराठवाडा वॉटर ग्रीड, वैनगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्प, कोकणातील १६७ टीएमसी पाणी मराठवाडा व खानदेशाकडे वळवण्याचा प्रकल्प, अशासारख्या प्रकल्पांची थांबलेली

अंमलबजावणी, शासकीय योजनात मागास भागाला मिळणारा अल्प निधी, सिंचन, शिक्षण, उद्योग, व्यवसाय, सहकारी संस्था अशा क्षेत्रात या चारही क्षेत्रावर निधी वितरणात होणारा अन्याय, मागास भागाचा अनुशेष दूर करण्यास वैधानिक विकास मंडळाचा वाटा मोठा असताना दिनांक ३० एप्रिल, २०२० नंतर मुदत संपल्यानंतर सुध्दा सरकारने वैधानिक विकास मंडळांना मुदत वाढ दिलेली नसणे, परिणामी या भागांचा खुंटलेला विकास व शिल्लक अनुशेषात वाढ झालेली असणे, सरकारने तातडीने वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ देण्याची आवश्यकता, सिंचन, पर्यटन, उद्योग, रस्ते, प्रक्रिया उद्योग याबाबतीत सर्वच विभागांचा अनुशेष मोठया प्रमाणावर असणे, उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाकडूनही कोकणावर अन्याय झाला असणे, त्यामुळे कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्याबाबत तातडीने निर्णय होण्याची आवश्यकता, तसेच, कोरडवाहू पिकांसाठी हेक्टरी रुपये २५,०००/- व बागायतीसाठी हेक्टरी रुपये ५०,०००/- ची मदत देण्याची निवडणुकीपूर्वी केलेली घोषणा, सरकारने सन २०२० व २०२१ मध्ये आलेल्या चक्रीवादळ, अतिवृष्टी, पूर, गारपीट, अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तुटपुंजी मदत करुन पूर्णपणे भ्रमनिरास केलेला असणे, महात्मा फुले कर्जमाफी योजनेत अनेक पात्र शेतकरी अद्याप वंचित असणे, प्रोत्साहनपर अनुदान देण्याची तसेच एकवेळ समझोता योजनेची २ वर्षपुर्ती घोषणेची सरकारने अद्याप अंमलबजावणी केलेली नसणे, शेतकऱ्यांना दिलेल्या वचनाची पुर्तता न करता, भ्रष्ट जिल्हा सहकारी बँकांच्या व्यवस्थापनांना शासनाकडून संरक्षण मिळणे, अन्य राज्यांनी शेतकऱ्यांना पॅकेजेस दिलेले असताना महाराष्ट्रात सरकारने कोणतेही पॅकेज दिलेले नसणे, शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ मिळत नसणे, चक्रीवादळ व अतिवृष्टीग्रस्तांसाठी जाहीर करण्यात आलेल्या दोन्ही वर्षाच्या पॅकेजचा लाभ बहुतांश शेतकऱ्यांना झालेला नसणे, निवडणूकपूर्व जाहीरनाम्यामध्ये शेतकरीहिताच्या अनेक योजना जाहीर करणे, परंतु गत २ वर्षात कोणत्याही घोषणेची अंमलबजावणी झालेली नसणे, शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणामुळे, अतिरिक्त ऊसाचा प्रश्न निर्माण होणे, तसेच द्राक्ष, डाळींब व कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत आलेला असणे, ऐन हंगामात कृषि पंपाच्या वीज जोडण्या तोडण्यात आल्या असणे, शेती पंपांसाठी पैसे भरुन लाखो शेतकऱ्यांना विद्युत जोडणी मिळालेली नसणे, कृषि क्षेत्रासाठी सुरु असलेल्या योजनांची ठप्प झालेली वा संथ गतीने सुरु असलेली अंमलबजावणी, परिणामी कृषी क्षेत्राची पूर्ण वाताहत झाली असणे, परिणामी शेतकरी बांधवामध्ये नैराश्य येऊन हजारो शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या, परिणामी संपुर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांमध्ये पसरलेले

अप्रकाशित प्रत

असंतोषाचे वातावरण तसेच विदर्भ, मराठवाडा, कोकण व खानदेशातील जनतेमध्ये भेदभावपूर्ण वागणुक दिल्यामुळे पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची उपयायोजना विचारात घेण्यात यावी."

**आठ : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

**(बुधवार, दिनांक १६ मार्च, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली अर्धा-तास चर्चेची सूचना) [अनुक्रमांक (१)] -**

(१) **सर्वश्री गोपिचंद पडळकर,** सदाशिव खोत, महादेव जानकर, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

मौजे शेरेवाडी (आवळाई), (ता.आटपाडी, जि.सांगली) येथील श्रीराम स्टोन क्रशर यांचेकडून अवैधरित्या दगड व मुरुमाचे उत्खनन होत असणे, उत्खननाकरीता पर्यावरण व प्रदूषण विभागाची तसेच, भूजल विज्ञान विभागाची परवानगी घेण्यात आली नसणे, सदर खाणपट्टा मंजूर करतांना नियम व अटींची पूर्तता करण्यात आली नसल्याने हा खाणपट्टा अनधिकृत असणे, खाणपट्ट्याच्या शेजारील पिण्याचा पाण्याच्या तलावामध्ये मोठया प्रमाणात उत्खनन केले असणे, त्यामुळे तलावाचे जलप्रदूषण होऊन पाण्याचा स्त्रोत संपण्याची शक्यता निर्माण झाली असणे, साधारणः ३ कि.मी. पर्यंत मोठ्या प्रमाणात धूळ वातावरणात पसरल्यामुळे २०० हेक्टर क्षेत्रातील शेतपिकांचे नुकसान झालेले असणे, तसेच परवाना व पासिंग नसलेली ट्रॅक्टर, जेसीबी व लोडिंगची वाहने इत्यादींच्या सहाय्याने अवैधरित्या उत्खनन केलेला दगड व मुरुम ट्रक व टिप्परमध्ये क्षमतेपेक्षा जास्त भरणे, ओव्हरलोड गाड्यांमुळे रस्त्यावरील वाहतुकीला व नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागत असणे, दगड व मुरुमाचे अवैधरित्या उत्खनन व प्रदूषण करणाऱ्या श्रीराम स्टोन क्रशर यांचेवर कारवाई करण्याबाबत शेरेवाडी ग्रामस्थांनी विभागीय आयुक्त, पुणे यांचेकडे दिनांक १५ फेब्रुवारी, २०२२ रोजी तक्रार केली असणे, तक्रार करुनही दोषींवर अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नसणे, त्यामुळे सदर प्रकरणाची तातडीने चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया''

**(सोमवार, दिनांक २१ मार्च, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) [अनुक्रमांक ( २ ते ४)] -**

(२) **सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे,** रामदास आंबटकर, प्रविण दटके, **वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्य वन्यजीव मंडळाच्या १६ व्या बैठकीत दहा पैकी आठ राखीव

संवर्धन क्षेत्राची अधिसूचना प्रसिध्द करण्यात आलेली असणे, या नवीन संवर्धन राखीव क्षेत्राचा व्यवस्थापन आराखडा तयार करण्याच्या सूचना शासनाने दिलेल्या असणे, सदर राखीव क्षेत्रास अभयारण्याचा दर्जा देण्याबाबत विभागीय स्तरावर समिती गठीत करण्यात आली असणे, समितीचे कार्य संथगतीने सुरु असल्याने माहे जानेवारी, २०२२ च्या अखेरीस झालेल्या राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीत राखीव क्षेत्रास अभयारण्याचा दर्जा देण्यात आलेला नसणे, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ मधील तरतूदीनुसार वन्यजीवांच्या संरक्षण आणि संवर्धनाच्या दृष्टीने योग्यता ठरविणे समितीचा उद्देश असणे, परंतू समितीच्या संथ कार्यवाहीमुळे दर्जा प्राप्त करण्यास अडचणी निर्माण होणे, त्यामुळे संवर्धन राखीव क्षेत्राला अभयारण्य घोषित करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री सुनिल शिंदे,** विलास पोतनीस, डॉ.मनिषा कायंदे, **वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबईत म्हाडाच्या अनेक उपकर प्राप्त इमारती जुन्या व जीर्ण झाल्याने इमारती कोसळून अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली असणे, याप्रकरणी शासनाकडे अनेकदा तक्रारी करुनही कोणतीही कार्यवाही होत नसणे, सदरहू इमारतींच्या दुरुस्तीकरिता महानगरपालिकेने रुपये ५०० कोटींची तरतूद करावी अशी मागणी सर्व स्तरावरुन होत असणे, विकास नियंत्रण नियमन (डीसीआर) मध्ये झालेल्या बदलामुळे विकासकांकडून पुनर्विकासामध्ये विलंब होत असणे, दक्षिण मुंबईतील इमारतीची दुरवस्था झाल्याने देखभाल, दुरुस्तीअभावी रहिवाशांना धोकादायक इमारतीत वास्तव्य करावे लागत असणे, सदरहू इमारतींच्या दुरुस्तीकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये शासनाप्रती असंतोष निर्माण झाला असणे, याबाबत मुंबईतील मोडकळीस आलेल्या शेकडो उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्तीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे,** रामदास आंबटकर, प्रविण दटके, **वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"उप संचालक, आरोग्य विभाग, नागपूर अंतर्गत पदोन्नती पात्र ९७ आरोग्य कर्मचाऱ्यांची आरोग्य सहाय्यक पदावर तथा ४९ क्षेत्र कार्यकर्ता या पदावरून आरोग्य कर्मचारी पदावर पदोन्नतीकरिता कर्मचाऱ्यांनी दिनांक २८ ऑक्टोबर, २०२१ रोजी आमरण उपोषण केले असणे, मा. सार्वजनिक आरोग्य मंत्री महोदयांनी दोन दिवसात पदोन्नतीचे आदेश देण्यात येतील असे आश्वासन दिलेले असणे, दिनांक ०९ नोव्हेंबर २०२१ रोजीच्या पत्रानुसार सर्व पात्र उमेदवारांच्या दस्ताऐवजाची पडताळणी पूर्ण झालेली असूनही पदोन्नतीचे

आदेश निर्गमित केलेले नसणे तसेच, जळगांव, पुणे, चंद्रपूर व नागपूर येथील जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांना आरोग्य सहायक पदावर पदोन्नतीचे आदेश दिलेले असणे, त्यामुळे उप संचालक, आरोग्य विभाग, नागपूर येथील पात्रता यादीतील १४६ कर्मचाऱ्यांनी पदोन्नतीचे आदेश न झाल्यामुळे आंदोलन करण्याचा निर्णय घेतलेला असणे, याबाबत कर्मचाऱ्यांना पदोन्नतीचे आदेश देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(सोमवार, दिनांक २१ मार्च, २०२२ रोजी बॅलटद्वारे काढण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) [अनुक्रमांक (५ व ६) ] -**

**(५) सर्वश्री रामराव पाटील,** सुरेश धस, नागोराव गाणार, **वि.प.स.**

"**मुंगी (ता.शेवगाव, जि.अहमदनगर) येथील जायकवाडी उजवा कालवा वितरीका क्रमांक पाचमधील चारी व चारीचा रस्ता बुजवून शासकीय मालमत्तेचे नुकसान केल्याबाबत**" या विषयावरील **श्री.रामराव पाटील व इतर वि.प.स.** यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १२१९९ ला दिनांक ०४ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**(६) सर्वश्री विक्रम काळे,** कपिल पाटील, सतिश चव्हाण, **वि.प.स.**

"**राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कॅशलेस वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना लागू करणेबाबत**" या विषयावरील **डॉ. रणजित पाटील व इतर वि.प.स.** यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १२२६८ ला दिनांक ०८ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

अप्रकाशित प्रत

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २१ मार्च, २०२२.

**राजेन्द्र भागवत**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद